REGISTERED No. 13434.

with Compliments
Manager, 'Artha'




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ११ जून १९४७ अंक २४

डॉ. वामनगोपाळ यांचा सारसापरिला

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात







## साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्यतितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तु
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २८

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, दमडेरे बोळाजवळ, पुणें २

## उत्पादनाच्या वाढशींतून कामगार वर्गाच्या चळवळीचें निरीक्षण

**श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांचें मराठा चेंबरमध्यें भाषण**

मराठा चेंबरची १३ वी वार्षिक सभा श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांचे अध्यक्षतेखाली रविवार, ता. ९ जून रोजीं भरली होती. त्यावेळीं श्री. शंकरराव ह्यांनीं आपल्या भाषणांत आजच्या टंचाईच्या प्रश्नाचें "हिंदी राष्ट्राच्या इतिहासांतील आणीबाणीची वेळ" असें यथार्थ वर्णन केलें. राष्ट्रांतील सर्व वर्गांनीं उत्पादन वाढीसाठी कमरा कसल्या पाहिजेत, असें ते म्हणाले. "सर्व जीवनोपयोगी वस्तूंचें अधिकाधिक उत्पादन हाच सध्याचा बिकट परिस्थितींत राष्ट्राला जगविण्याचा एकमेव मार्ग आहे. सबब, उत्पादनाच्या वाढशींतूनच आपल्या सर्व राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांकडे पहाणें ह्यापुढें राष्ट्रहितकारक ठरणार आहे" असें सांगून उत्पादन कार्यांतील महत्त्वाचा घटक जो कामगार वर्ग, त्याच्या चळवळींसंबंधीं त्यांनीं खालील विचार व्यक्त केले:—

**आजची कामगार चळवळ**

हिंदी कामगाराचा जीवनदर्जा वाढविणें, हें कामगार चळवळीचें उद्दिष्ट म्हणून सांगण्यांत येतें. "जीवनदर्जा" म्हणजे काय? तर समाजांतील जीवनावश्यक वस्तूंचा उपभोग घेण्याची सर्वसामान्य व्यक्तीची कुवत. आतां, जीवनदर्जा वाढला पाहिजे, म्हणजे काय केलें पाहिजे? तर त्या व्यक्तीला, अधिकाधिक वस्तूंचा उपभोग घेण्याची शक्यता निर्माण केली पाहिजे. पण हें कधीं शक्य आहे? जर वस्तूंची निर्मिती वाढत्या प्रमाणावर झाली तरच!

वाढत्या जीवनदर्जाची मागणी पुढें येत असतां आमचें राष्ट्रीय उत्पादन गेलीं तीन वर्षें घटत आहे. उत्पादनांतील या वाढत्या घटीस जुनी यंत्रसामग्री, कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा, जातीय दंगलीमुळें निर्माण झालेली अस्थिर परिस्थिति, यासारखीं अनेक कारणें आहेत. पण या कारणांत अत्यंत महत्त्वाचें कारण म्हणजे देशभर उसळलेली संपाची लाट.

हें सर्व सांगण्याचा उद्देश कामगारांचा संप करण्याचा अगर संघटना करण्याचा हक्क नाकारावा, असा मुळींच नाहीं. आपल्या मागण्यासाठी संघटित होणें व जरूर त्या प्रसंगीं संपाचें हत्यार उपसणें हा कामगारांचा न्याय्य हक्क आहे. पण संपासारख्या अत्यंत तीक्ष्ण व भेदक हत्याराचा उपयोग कधीं करावयाचा, हें अत्यंत संयमानें व विचारानें ठरविलें पाहिजे.

एखाद्या धंद्यांतील कामगारांच्या संपाचे परिणाम त्या धंद्यापुरतेच मर्यादित रहात नाहींत तर त्या धंद्यावर अवलंबून असणाऱ्या दुसऱ्या धंद्यांच्या उत्पादनावरही होतात. संपामुळें उत्पादनांत येणाऱ्या व्यत्ययाची झळ कामगारांना लागतेच, कारण उत्पादन घटलें कीं वस्तूंच्या किंमतींत वाढ होते. म्हणजेच जीवनखर्च वाढतो व मिळणारी वेतन वाढ कामगाराचा जीवनदर्जा वाढविण्याच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरते. परंतु उत्पादनाचें प्रमाण व कामगाराचा जीवनदर्जा यामधील हा संबंध कामगारांना स्पष्ट करून सांगण्याची महत्त्वाची जबाबदारीच आजची कामगार चळवळ व तिचे पुढारी पार पाडीत नाहींत असें खेदानें म्हणावें लागतें. परंतु कामगारांच्यापुढें विधायक कार्यक्रम ठेवण्याऐवजी, सध्याचे कित्येक कामगार पुढारी त्यांना संपासारख्या विघातक कृत्यास प्रोत्साहन देतांना आढळतात. याचें कारण, कामगार संघटना करण्यामागील त्यांचा हेतु निराळाच असतो. तो म्हणजे, कामगार-संघाच्या द्वारें आपआपल्या विशिष्ट राजकीय पक्षास बळकटी आणणें. त्यामुळें कामगार व मालक यांमधील वादग्रस्त प्रश्न तडजोडीनें वा लवादानें सोडविण्यासाठी, व औद्योगिक क्षेत्रांत शांतता राखण्यासाठी, सरकारनें निःपक्षपाती योजना केली असतांही, जाणूनबुजून ती धाब्यावर बसविणें, व उत्पादनांत पडणारा खंड अगर प्रत्यक्ष कामगारवर्गाचें होणारें नुकसान, यांकडे डोळेझांक करून, बारीकसारीक सबबींवर कामगारांना संपावर जाण्यास प्रोत्साहन देणें यासारखीं आततायी कृत्यें आज या पुढाऱ्यांकडून होत आहेत.

कामगार संघटनेंतील या बेजबाबदार वृत्तीचे चटके कामगार पुढाऱ्यांना अलीकडे वेळोवेळीं जाणवूं लागल्यामुळेंच कीं काय, त्यांनीं गेल्या एप्रिलमध्यें "इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस", या नांवाच्या नव्या कामगार संघटनेची स्थापना केली आहे. या नव्या कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुरेशचंद्र बानर्जी यांनीं या संघटनेबद्दल बोलतांना कलकत्ता येथें ता. ११ मे रोजीं असे उद्गार काढले:— "दारुण दारिद्र्य नाहींसें करण्याकरतां हिंदुस्थानाला त्याच्या कारखान्यांतील व शेतांतील उत्पादनाची जास्तीत जास्त वाढ होण्याची आवश्यकता आहे. म्हणून या देशांत शक्य तितके कमी संप होणें आवश्यक आहे."

हें ध्येय गांठण्यासाठी, या नव्या संघटनेनें प्रामाणिकपणें व धडाडीनें प्रयत्न केल्यास, समाजांतील सर्व वर्गांचें सहकार्य तर तिला मिळेलच, पण राष्ट्राच्या इतिहासांतील अत्यंत आणीबाणीच्या वेळीं कामगार वर्गास योग्य मार्गदर्शन केल्याचें व चालू आर्थिक अरिष्टापासून राष्ट्राचें संरक्षण केल्याचें श्रेयही तिला मिळेल, हें निश्चितच.

---

**भोर स्टेट बँकेच्या शिरवळ येथील शाखेचें उद्घाटन—** भोर स्टेट बँक लि., भोर ह्या बँकेच्या शिरवळ (ता. विचित्रगड, भोर संस्थान) शाखेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, ता. १३ जून रोजीं श्रीमंत सर राजा रघुनाथराव पंतसचिव राजेसाहेब, सं. भोर ह्यांचे हस्तें सरकारी वाडा, शिरवळ, येथें दुपारीं ४ वाजतां होणार आहे. बँकेची पाली येथें शाखा आहेच. म्हणजे, आतां बँकेच्या एकूण ३ कचेऱ्या होत आहेत.

**पोलंडमधून इंग्लंडला अन्न—** इंग्लंड व पोलंड ह्यांच्या दरम्यान तीन वर्षें मुदतीचा एक तात्पुरता व्यापारी करार झाला असून पोलंडमधून इंग्लंडला जाणाऱ्या मालांत अन्नधान्य प्रामुख्यानें असणार आहे.

**सिंधसाठी ब्रिटिश तज्ज्ञाची आयात—** बृहत् कराचीच्या योजनेसाठी नगर-रचना-शास्त्राचा एक तज्ज्ञ इंग्लंडहून आणण्याचें सिंध सरकारनें ठरविलें आहे. त्याला दरमहा ३ हजार रुपये पगार मिळणार आहे.

**ऑस्ट्रेलिआकडून गहूं येणार—** हिंदुस्थानकडून आळशीचें तेल घेऊन त्याच्या बदली गहूं पुरविण्याबद्दल वाटाघाटी चालू असल्याचें ऑस्ट्रेलिअन विधिमंडळांत सांगण्यांत आलें.

**मद्रास प्रांतांत करमणुकीवरील करांत वाढ—** मद्रास प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचें उत्पन्न वाढविण्यासाठी मद्रास सरकारनें करमणुकीवरील करांत वाढ करण्याचें ठरविलें आहे. ही वाढ तिकिट विक्रीच्या किंमतीच्या ३२½ टक्के इतकी करण्यांत येणार आहे.

**श्वेत रशिआची पुनर्घटना—** सोव्हिएट् रशिआंतील एक राज्य श्वेत-रशिआ, यांतील अन्नधान्याची टंचाई अनराच्या मदतीनें पुष्कळच कमी झाली. आणि त्यामुळें औद्योगिक पुनर्घटनेंत त्या राज्यानें बरीच प्रगति झपाट्यानें केल्याचें वृत्त आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ११ जून, १९४७




प्रा. वा. मो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी आयुर्विमा व्यवसायाच्या क्षेत्राची पहाणी

### वैद्यनाथन कमिटीच्या शिफारसी

सप्टेंबर, १९४४ मध्यें हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या विमा सल्ला समितीच्या " युद्धोत्तर उपसमिती "नें आपला अहवाल सरकारच्या व्यापार खात्यास गेल्या वर्षी सादर केला, तो आतां सरकारनें प्रसिद्ध केला आहे. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स, श्री. वैद्यनाथन हे तिचे अध्यक्ष होते. हिंदुस्थानांत विमा व्यवसायाचा प्रसार इतर देशांचे मानानें फारच कमी प्रमाणांत झालेला आहे, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. विम्याचें महत्त्व लोकांना अजून पटलेलें नाहीं, हें खरें असलें तरी दारिद्र्य हेंच ह्या मागासलेपणाचें खरें कारण आहे, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. लोकांची प्राप्ती वाढल्याखेरीज आणि त्यांच्या रोजच्या गरजा भागल्याखेरीज विम्याच्या संरक्षणाच्या प्रचाराचा फारसा उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे. हल्लीं जे लोक विमे उतरतात, त्यांपैकीं किती तरी लोक पॉलिसींचे तारणावर मिळेल तेवढें कर्ज नेहमींच काढीत असतात. अशा रीतीनें, विम्यापासून त्यांस मिळणारें खरें संरक्षण नष्ट होत जातें. सर्व कंपन्यांनीं संघटितपणें व खर्च वाटून घेऊन विम्याचा प्रचार करावा, असें वैद्यनाथन कमिटीनें सुचविलें आहे, त्याच्या मर्यादा वरील प्रमाणें आहेत.

विमा कंपन्यांतील नोकर व कंपन्यांचे एजंट ह्यांस विमाविषयक शिक्षण देण्यासाठी, ग्रेट ब्रिटनमधील चार्टर्ड इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटच्या दर्जाची संस्था येथें आवश्यक आहे, असें कमिटीनें सुचविलें आहे. विमेदारांचें खरें मार्गदर्शन त्याखेरीज नीट होणार नाहीं. विमेदारांचा व एजंटांचा निकट संबंध येतो ह्या दृष्टीनें एजंटांस विमा व्यवसायाची पायाशुद्ध माहिती असणें अगत्याचें आहे. आपल्या स्वतःला ज्यास्तींत ज्यास्त कमिशन कसें मिळेल, इकडे एजंटाचें लक्ष असतें; विमेदाराची गरज तो विचारांत घेईलच असें नाहीं. ह्या संबंधांतहि सुधारणा झाली पाहिजे. विमाविषयक वाङ्मयाचा संग्रह करून तो सर्वांस उपलब्ध होण्याचें महत्त्वहि कमिटीनें प्रतिपादन केलें आहे.

विमा कंपन्यांचें यश त्यांच्या अनुभवास येणारें मृत्यूंचें प्रमाण, त्यांच्या गुंतवणुकीवर पडणारें व्याज आणि त्यांच्या व्यवस्थेचा खर्च, ह्यांच्या अनुकूलतेवर अवलंबून असतें. ह्यांपैकी, किती विमेदार मृत्यू पावतील, ही गोष्ट कंपन्यांच्या चालकांचे अधिकाराबाहेरची आहे. अर्थात्, विमेदारांची निवड कसोशीनें केल्यास, मृत्यूंचें प्रमाण कमी पडण्याचा संभव असतो हें उघड आहे. व्याजाचे प्रचलित दर उतरत गेल्यावर, विमा कंपन्यांना तरी भारी व्याज कसें मिळणार ? त्यांतच कराचा बोजा वाढत चाललेला आहे. त्या कारणानें व्याजाचें निवळ उत्पन्न फारच घटलें आहे. तेव्हां, व्यवस्थेच्या खर्चांत बचत करणें एवढीच गोष्ट कंपन्यांच्या आवाक्यांतील आहे. इतर देशांपेक्षा हिंदुस्थानांतील कंपन्यांचा व्यवस्थेचा खर्च अधिक आहे आणि त्यांत काम मिळविण्यासाठी केलेल्या खर्चाचा हिस्साच मोठा आहे. ज्या कंपन्यांची परिस्थिति समाधानकारक नाहीं अशा कंपन्यांच्या बाबत उपाययोजना करण्याचा अधिकार सुपरिंटेंडेंट ऑफ ------ आहे ... कंपन्यांची स्थिति आर्थिक बिघडे- पर्यंत तो कांहीं करूं शकत नाहीं आणि नंतर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं असा अनुभव आहे. कंपन्यांचे खर्च कमी करण्यासाठी कायद्याचा अवलंब केल्याविना गत्यंतर नाहीं, असें कमिटीचें मत झालें आहे. एजंटांचें कमिशन कमी करावें, चीफ एजंटांचें कमिशन कमी करावें, मध्यस्थांची संख्या कमी करावी आणि बाकीचा खर्चहि उतरावा अशी कमिटीची सूचना आहे. हप्त्यांचे दर ठरवितांना खर्चासाठी त्यांत जेवढी तरतूद केलेली असते, त्याचे बाहेर कंपन्यांचा खर्च जाऊं नये; नव्या कंपन्यांना पहिलीं कांहीं वर्षें हें शक्य होणार नाहीं व त्यांस थोडा जास्त खर्च करण्याची मोकळीक असावी; परंतु त्यांनींहि हप्त्यांचे रकमेंत बोनससाठी माया ठेवलेली असेल तिचे बाहेर खर्च करूं नये असा कमिटीचा सल्ला आहे. एजंटांचें कमिशन आजहि ४०% इतकेंच असलें, तरी वेगवेगळ्या नांवानें वावरणाऱ्या मध्यस्थांस बराच पैसा द्यावा लागतो, ह्या गोष्टीवर मागेंहि बरीच टीका झालेली होती.

हिंदी कंपन्यांपैकीं फारच थोड्या कंपन्या पुरेशा मोठ्या आहेत; बहुसंख्य कंपन्या अत्यंत लहान असल्याकारणानें त्यांच्या खर्चाचें प्रमाण अप्रमाणबद्ध होतें. हिंदुस्थानांत विम्याचा प्रसार होत चालला, तसतशी कंपन्यांची संख्याहि भरमसाठ वाढली आणि कंपनी कितीहि तोट्यांत चालली तरी ती तशीच चालू ठेवून स्वार्थी चालक विमेदारांचें मात्र नुकसान करीत असतात. अशा कंपन्यांचें दुसऱ्या चांगल्या मोठ्या कंपन्यांशीं एकत्रीकरण होणें इष्ट आहे, परंतु वाईट व लहान कंपन्यांच्या चालकांस मोठ्या व चांगल्या कंपनींत पूर्वीसारखा दर्जा व पगार हीं मिळणें शक्य नसतें आणि हे चालक स्वाभाविकपणेंच एकत्रीकरणास विरोध करतात. तेव्हां विमेदारांच्या हिताकडे पाहून त्यांनीं वागावें, ही कमिटीची सूचना अमलांत येणें जरूर असलें तरी कठीण आहे.

विमा कंपन्यांस त्यांच्या पैशांच्या गुंतवणुकीबाबत अधिक स्वातंत्र्य मिळावें, कंपन्यांच्या कोणत्याहि भागीदारास एकूण १० पेक्षा ज्यास्त मतें असूं नयेत, कंपनीच्या मूल्यमापनांतील वाढाव्याच्या १०% पेक्षा ज्यास्त वाटा भागीदारांस मिळूं नये, कंपन्यांवरील कराचा बोजा उतरविण्यांत यावा, इत्यादि शिफारसीहि वैद्यनाथन कमिटीच्या अहवालांत आढळतात. एकंदरीनें पहातां, हिंदी विमा व्यवसायाच्या वाढीच्या दृष्टीनें कांहीं विशेष असें कमिटीनें सांगितलें आहे काय, हें पाहूं गेलें असतां नवीन सूचना आढळत नाहींत. हिंदी विमा व्यवसायापुढील खरा प्रश्न, विम्याच्या लोकप्रियतेस बाध येऊं न देतां म्हणजे हप्त्यांचे दर फार न वाढवितां, विमा व्यवसाय किफायतशीर कसा होईल, हा आहे. हप्त्यांच्या वाढीस निश्चित मर्यादा आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. हिंदी कंपन्या कांहीं जुन्या तर कांहीं नव्या, कांहीं मोठ्या तर कांहीं लहान, कांहीं मोठ्या भांडवलाच्या तर कांहीं लहान भांडवलाच्या अशा आहेत. त्या सर्वांस एकजात लागू पडणारे नियम तयार करणें अशक्यप्राय आहे. हिंदी आयुर्विम्यापुरताच येथें विचार केला आहे आणि विमा व्यवसायाच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न तर स्वतंत्रच आहे. वैद्यनाथन कमिटीनें हिंदी कंपन्यांना, एजंटांना व चालकांना उपदेशपर सल्ला दिला आहे, व प्रगतीचा ढोबळ मार्गहि दाखविला आहे. त्या संबंधांत त्यांनीं जास्त निश्चित योजना आखून दिली असती व सुचविलेल्या नियंत्रणाचा कायदेशीर आराखडा तयार करून दिला असता तर चर्चेचें पाऊल निश्चित आणखी पुढें पडलें असतें.

# स्फुट विचार

## जागतिक बँकेनें दिलेलें पहिलें कर्ज

जागतिक बँकेनें फ्रान्सच्या युद्धोत्तर पुनर्घटनेसाठी नुकतेंच २५ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें. ह्या बँकेतर्फे देण्यांत आलेलें हें पहिलेंच कर्ज असून त्याबद्दल बँकेनें घातलेल्या अटी इत्यादी संबंधीं बरीच टीका होत आहे. फ्रान्सला दिलेलें हें कर्ज ३० वर्षें मुदतीचें असून व्याजाचा दर ३¼ टक्के असा आहे. पण व्याजाच्या दराशिवाय हप्त्यांची फेड करून उरलेल्या मुद्दलावरील कमिशन लक्षांत घेतां व्याजाचा दर ४¼ टक्के येवढा पडतो. एक वर्षापूर्वी अमेरिकन सरकारनें इंग्लंडला ५० वर्षें मुदतीचें ३ अब्ज, ५ कोटी डॉलर्सचें कर्ज अवघ्या २ टक्के व्याजानें दिलें. हिंदुस्थान सरकारनें सयामला दिलेल्या कर्जाच्या व्याजाचा दरही याच्यापेक्षा कमी आहे. युद्धामुळें हानि झालेल्या देशांची अर्थव्यवस्था पुन्हा मार्गाला लावण्याच्या दृष्टीनें कर्ज देणें हा जागतिक बँकेचा एक प्रमुख उद्देश आहे. अर्थात व या व्यवहाराला शुद्ध व्यापारी स्वरूप नसून त्यांत व्यवहार आणि मानवतेबद्दल आस्था यांचा संगम झालेला असावयास पाहिजे. निदान तसा तो असावा अशी ऋणको राष्ट्रांची अपेक्षा असणें साहजिक आहे. पण शुद्ध व्यवहार म्हटला तरी सुद्धां हिंदुस्थान सारख्या राष्ट्राला जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याची पाळी आली तर मोठा अनवस्था प्रसंग ओढवणार आहे. खुद्द हिंदुस्थानांत सरकार ३ किंवा त्याहूनही कमी व्याजाच्या दरानें कर्ज उभारूं शकत आहे. पण जागतिक बँकेकडून मात्र अशा अल्प व्याजाच्या दरानें कर्ज मिळण्याची शक्यता आजच्या बँकेच्या धोरणावरून दिसत नाहीं. उद्यां हिंदुस्थानाच्या इंग्लंडकडील पौंडी येण्याचें दीर्घ मुदतीच्या कर्जांत रूपांतर झालें तर या कर्जावर हिंदुस्थानला जास्तींत जास्त ३ टक्के व्याज मिळेल आणि हिंदुस्थाननें डॉलर्सचें कर्ज काढल्यास मात्र त्यापेक्षा अधिक व्याजाचा दर द्यावा लागेल. जागतिक बँकेचे व्याजाचे दर अमेरिकेंतील व्याजाच्या दरावर अवलंबून ठेवल्यामुळें त्या संस्थेचे दर तिच्या हेतूशीं विसंगत झाले आहेत अशी टीका तज्ज्ञांकडून करण्यांत येत आहे.

---

## विभक्त हिंदुस्थान आणि भांडवल

हिंदुस्थानची फाळणी होण्याचें आतां जवळजवळ निश्चित ठरलें आहे. फक्त पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांच्या भौगोलिक मर्यादाच ठरावयाच्या उरल्या आहेत. हिंदुस्थान-सारख्या खंडप्राय देशावर एकाच सरकारचें अधिराज्य असणें देशाच्या औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें इष्ट असलें तरी धार्मिक पायावर देशाची विभागणी होण्याचें ठरल्यानंतर भांडवलाच्या भौगोलिक स्थायीपणावर त्यांचा परिणाम होणें अपरिहार्यच आहे. पंजाबची फाळणी होणार हें स्पष्ट दिसूं लागल्यावर पंजाबमधील हिंदू भांडवलदार वर्ग आपलें भांडवल पंजाबांतून काढून घेऊन दिल्ली प्रांतांत गुंतविण्याच्या प्रयत्नास लागल्याचें वृत्त आहे. अशा तऱ्हेनें पंजाबांतून बाहेर पडणाऱ्या भांडवलाची किंमत २५० कोटी रुपयांच्या आसपास आहे असें म्हणतात. लाहोरमधील एका बँकेनें आपली कचेरी दिल्लीला हलविण्यासाठी भागीदारांची विशेष सभा बोलवल्याचेंही वृत्त मध्यंतरी प्रसिद्ध झालें होतें. या बँकेचें खेळतें भांडवल ५० कोटींच्या घरांत आहे. लाला भीमसेन साचार मुख्य भागीदार असलेली एक कंपनीही असाच विचार करीत आहे. याशिवाय लाहोरमधील तीन मोठ्या बँका आणि विमा कंपन्याहि आपलें बस्तान तेथून हलविण्याचा विचार करीत आहेत असें समजतें. कांहीं बड्या भांडवलदारांनीं असेहि उद्गार काढल्याचे ऐकिवांत आहे कीं, " आम्ही गेल्यावर कांहीं कां होईना; पाकिस्तानचें आर्थिक दृष्ट्या वाळवंट झालें तरी आपणाला त्याची परवा नाहीं." प्रत्यक्ष कंपन्यांच्या दृष्टीनें भांडवलाच्या या हालचालींत फारसें नुकसान नसलें तरी औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें जनतेचें नुकसान होणार आहे. यापुढें पाकिस्तान आणि हिंदुस्थान या दोन विभागांसाठी स्वतंत्र औद्योगिक योजना आंखाव्या लागतील. त्या कागदोपत्रीं तयार होण्यांत कालापव्यय होईल आणि आर्थिक परिस्थिति सुधारण्याचें लांबणीवर पडेल.

---

## "कापसाखालील जमीन वाढवा"

इंडिअन कॉटन ग्रोइंग रिव्ह्यू या नियतकालिकाच्या एप्रिलच्या अंकांत हिंदुस्थानांतील कापसाच्या लागवडीखालील जमीन वाढविण्यासंबंधी एक लेख आलेला आहे. हिंदुस्थानांतील कापसाची लागवड वाढविल्यानें अन्नधान्याच्या निर्मितींत कमतरता येणार नाहीं; उलट परदेशी कापूस पाठवून बाहेरून जरूर पडल्यास अन्नधान्य आणतां येईल असा या लेखाचा मथितार्थ आहे. याबाबत खरी वस्तुस्थिति काय आहे याचा खुलासा मध्यवर्ती सरकारनें करून योग्य तो मार्ग दाखवून दिला पाहिजे. हिंदुस्थान युद्धपूर्व कालांत सुमारें २ कोटी, ५० लाख एकर जमिनींत कापूस पिकवीत असे. सध्यां कापसाच्या जमिनीखालील एकर १ कोटी, ४० लाखांपर्यंत खाली उतरलेले आहेत. ही परिस्थिति अशीच चालू राहिली तर हिंदुस्थानकडून कापूस खरेदी करणाऱ्या देशांना दुसऱ्या देशांकडून तो घ्यावा लागेल. सध्यांच बेल्जम, अमेरिका, फ्रान्स इत्यादी राष्ट्रें कापसासाठी दुसऱ्या देशांकडे पाहूं लागली आहेत. अमेरिका कापसाच्या निर्यातीला सरकारी मदत देत असून, शिवाय कापसाची लागवडही ५० टक्क्यांनीं वाढवीत आहे. हिंदुस्थान मात्र कापसाच्या निर्यातीवर ४० रुपये खंडी जकात घेत आहे. हिंदुस्थानांतील अन्नधान्याची निर्मिती कापसाच्या लागवडीनें कमीअधिक होण्याची शक्यता नाहीं. हिंदी अन्नधान्याच्या उत्पादनापैकी ९० टक्के उत्पादन कापसाची लागवड वाढवूनही पूर्वीप्रमाणें चालू राहील, अशा प्रकारची विचारसरणी वरील लेखांत प्रगट करण्यांत आली आहे. हिंदुस्थानची अन्नधान्याची गरज आणि उत्पादन यांत खरोखर तफावत किती आहे याचा खात्रीलायक निर्णय केल्याशिवाय कापसाच्या लागवडीला उत्तेजन देणें किंवा त्यावरील निर्बंध काढून टाकणें योग्य होणार नाहीं.

---

**महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें**—वरील विद्यालयाचे वर्ग ता. ७ जून ऐवजीं ता. १४ जून रोजीं सुरू होतील व विद्यालयाचें उद्घाटन अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें त्या दिवशीं दुपारीं १॥ वाजतां होईल असें समजतें.

**ब्रिटनचे पंतप्रधान अमेरिकेला जाणार**—ब्रिटनचे पंतप्रधान मि. ॲटली, हे वॉशिंग्टनला जाणार असल्याचे ड्र्यू पिअर्सन या अमेरिकन बातमीदारानें जाहीर केलें आहे ड्र्यू पिअर्सन हे गुप्त वार्ता प्रकट करण्याबद्दल वृत्तपत्रीय व वार्ताहरांच्या जगांत प्रसिद्ध आहेत.

**सोव्हिएटव्याप्त जर्मनी**—जर्मन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे अध्यक्ष कर्ट शूमॅकर यांनीं अशी सूचना केली आहे कीं सोव्हिएटव्याप्त पूर्व जर्मनींतील नागरिकांना पश्चिम जर्मनींत रहावयाचें आहे कां पूर्व जर्मनींत रहावयाचे आहे, याबद्दल सार्वत्रिक मतनोंदणी पद्धतीनें निर्णय घेण्यांत यावा. या मतनोंदणीच्या प्रसंगीं आंतरराष्ट्रीय नियंत्रण ठेवण्यांत यावें, अशीहि त्यांची सूचना आहे.

## फळांचे टिकाऊ पदार्थ करण्याचे धंद्यास संरक्षण

**( श्री. एन. जी. आपटे, बी. एजी., एम. एससी., इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रि. रिसर्चचे सभासद, यांचा अभिप्राय )**

टॅरिफ बोर्डाच्या महत्वाच्या शिफारशी सरकारनें मान्य केल्या आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. हा धंदा हिंदुस्थानांत नवीनच असल्यानें व त्यास लागणारी यंत्रसामुग्रीही परकी असल्यानें धंदा सर्वस्वी परावलंबी असाच आहे. टॅरिफ बोर्डाच्या शिफारशींत यंत्रसामग्री येथें करवून घेण्यास प्रोत्साहन देणारी एकही शिफारस नाहीं. या धंद्यास लागणारी यंत्रसामुग्री ही रचनेंत सोपी असल्यानें ती येथें करवून घेण्याचे प्रयत्न सरकारनें, टॅरिफ बोर्डाची शिफारस नसली तरी, करावे. या गोष्टीस हमखास यश येईल. यंत्रसामग्री येथें तयार झाल्यावरच या धंद्यास खरें स्थैर्य प्राप्त होईल. हिंदुस्थानसारख्या खंडप्राय देशांत अनेक प्रकारचीं फळें पिकतात व त्यापासून अनेक पदार्थ करतां येण्याजोगे आहेत. त्यास निरनिराळ्या प्रकारची यंत्रसामग्री लागणार आहे. ती येथें तयार करवून घेण्यास सरकारनें उत्तेजन द्यावें. म्हणजे जागतिक उत्पादनास यशस्वी रीतीनें तोंड देतां येईल.

या प्रश्नाचा आणखी एक विभाग आहे, आणि तो म्हणजे फळबागवाल्यांना जोड धंदा म्हणून होय. टॅरिफ बोर्डापुढें ही बाजू मांडली गेली नाहीं व टॅरिफ बोर्डानेंही ती मागितली नाहीं. परंतु याचाही विचार सरकारनें करण्याजोगा आहे. आतां दिलेलें संरक्षण तर हवेंच आहे. परंतु त्याचबरोबर यंत्रसामग्री बनविण्याचे कारखाने व प्रत्यक्ष फळबागा असलेल्यांना टिकाऊ पदार्थ करण्याची शिकवण व तेथें तयार झालेला माल विकण्याची व्यवस्था एवढें सरकारनें प्रारंभीं करून मागीं लावल्यास तीन वर्षांनंतर संरक्षण काढून टाकण्याच्या प्रयत्नास यश येईल.

### सत्यप्रकाश ( राज्यारोहण खास अंक )

सावंतवाडी येथील सत्यप्रकाश साप्ताहिकानें सावंतवाडीचे राजेसाहेब ह्यांच्या राज्यारोहणानिमित्त खास अंक प्रसिद्ध केला आहे. हल्लीच्या अडचणीचे परिस्थितींतहि १०० पृष्ठांचा हा अंक उत्कृष्ट असा झाला आहे. अंकांत श्री. मातोश्री पार्वती देवी राणीसाहेब रीजंट व राजेसाहेब ह्यांचीं चरित्रें व राजघराण्यांतील स्त्री-पुरुषांचीं अनेक चित्रें देण्यांत आलीं आहेत. "सावंत भोंसले आणि त्यांचें सिसोदे कुलीनत्व" व "वाडकर सावंत आणि इंग्रज" हे लेख माहितीपूर्ण व उद्बोधक आहेत. राज्यारोहण समारंभाचें वर्णन व त्यावेळचीं भाषणेंहि अंकांत दिलेलीं आहेत. रंगित चित्रांची व इतर छपाई चांगल्या दर्जाची व टापटिपीची आहे व अंक वाचनीय झाला आहे. संपादक, मुद्रक व प्रकाशक श्री. त्रिं. आ. धारणकर हे अभिनंदनास पात्र आहेत.

### दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें खपलेलें भांडवल ६,२७,२०० रु. असून वसूल भांडवल ३,१३,६०० रु. आहे. ठेवी सुमारें ३२ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें १०३ लक्ष रु. रोख बाळगले असून १० लक्ष रुपयांच्या हुंड्या डिस्कौंट केल्या आहेत आणि ११¾ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. १९४६ सालीं बँकेस निव्वळ नफा ४१,५९२ रु. झाला. सांगली संस्थानचे डेव्हलपमेंट मंत्री श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी., हे बँकेचे चेअरमन असून श्री. एल. एन्. शहा, बी. कॉम., सर्टि. ए. आय. आय. बी., हे मॅनेजर आहेत. बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस कोल्हापूर येथें असून तिच्या शाहुपुरी (कोल्हापूर), जयसिंगपूर, सांगली व मिरज येथें शाखा आहेत.

## दि बँक ऑफ् सिटिझन्स लि., बेळगांव

**( बँकेची स्थापना : १९३७ )**

**तुलनात्मक प्रगतीचा तक्ता**

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निव्वळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंड्चा दर (% करमाफ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | |
| १९३८ | १०,६६० | — | ५१,७३६ | ६२,७६६ | — | — | — | — |
| १९३९ | १२,७०० | — | ८७,६६६ | १,००,९५४ | ५,३९८ | ७६९ | ५०३ | ४ |
| १९४० | ४०,६३५ | १५० | १,१४,५४५ | १,५७,१०४ | ७,७७३ | १,६७५ | ७७१ | ५ |
| १९४१ | ४५,८२० | ५५० | २,०७,९५९ | २,५८,९४२ | १४,१०९ | ३,०४५ | २,२६८ | ७ |
| १९४२ | ६१,२७० | १,३२५ | ५,४२,३८८ | ६,१४,७८२ | २५,५२८ | ४,७६० | २,६२९ | ५ |
| १९४३ | ७९,२७० | ३,३२५ | १३,०५,७५७ | १४,१६,९२५ | ४९,९०६ | १९,२३४ | ३,३७४ | ५ |
| १९४४ | १,००,००० | १०,०१५ | २४,६८,७५६ | २६,३७,१२५ | ९३,०६८ | २८,०९३ | ५,६११ | ६ |
| १९४५ | २,४२,७८० | ४०,७९० | ३१,६२,२०२ | ३७,१३,३२१ | १,३६,६६६ | ३५,६२३ | १२,५७९ | ६ |
| १९४६ | ३,३९,३५० | ६७,७९० | ४६,१४,४९६ | ५१,१८,०५४ | २,३४,४९१ | ५८,४७७ | १५,९५६ | ६ |

**शाखांच्या स्थापनेचा अनुक्रम—**

| १९४१/४२ | १९४२/४३ | १९४३/४४ | १९४४/४५ | १९४५/४६ |
|---|---|---|---|---|
| गणपतगल्ली | निपाणी | धारवार | बैलहोंगल | कारवार |
| खानापूर | चिक्कोडी | नंदगड | हल्याळ | शिर्सी |
| अळणावर | | कँप | हुबळी | |
| | | ठळकवाडी | | |

## खेड्यांतील बँकिंग

( लेखक: श्री. कृ. मा. बावर )

खेड्यांतील लोकांजवळ पैसा फारसा असत नाहीं. सामान्यतः पोटापुरता शेतांतील माल बऱ्याचजणाजवळ असतो. कांहीं थोड्या जमीनदारांजवळ मात्र हा कच्चा माल गरजेपेक्षां अधिक असतो व तो विकून ते पैसा करतात. ह्या पैशांतून ते आपल्या इतर गरजा, कपडेलत्ते वगैरे भागवितात. सामान्य शेतकऱ्यांना शहरांत किंवा खेड्यांतच मोलमजुरी करून पैसा मिळवावा लागतो, त्याशिवाय त्यांच्या गरजा भागत नाहींत.

अशी स्थिति असली तरी सुगीच्या वेळेला बऱ्याच शेतकऱ्यांच्या हातांत पैसा येतो. पोटाला चिमटा घेऊन का होईना, कांहीं जण जवळचा कच्चा माल विकून पैसा जमवितात. शेतसारा भागविणें, कपडेलत्ते घेणें, गरजेच्या इतर वस्तू घेणें, मुलांचीं लग्नें वगैरे उरकणें हीं किंवा असलींच इतर कामें त्यांना ह्या पैशांतून उरकावयाचीं असतात. कांहीं शेतकऱ्यांना ह्या कामासाठींच सावकाराकडून कर्ज काढण्याचीही पाळी येते.

कोणत्या का कारणानें शेतकऱ्याच्या हातांत जेव्हां थोडा-फार पैसा येतो, तेव्हां तो रक्षण कसा करावा किंवा योग्य त्या कामाला लावीपर्यंत कसा सांभाळावा, हें खेड्यांतील पुष्कळ लोकांना समजत नाहीं. माल विकून घेतलेल्या कांहींच्या नोटा बैलांनीं किंवा म्हशींनीं खाऊन टाकल्याचीं उदाहरणें आहेत! हातांत पैसा पडतांच दारू सारख्या व्यसनांत किंवा नाच–तमाशांत उधळणारेही कांहीं आढळतात. कांहींजण घरांत कुठेंतरी तो दडवून ठेवण्याचा प्रयत्न करतात आणि केव्हां केव्हां उंदरांनीं पळवून नेल्यामुळें किंवा चोरांनीं लांबविल्यामुळें त्यांना हात चोळीत बसावें लागते, तर कांहींजण विश्वासानें दुसऱ्याजवळ ठेव म्हणून कांहीं रक्कम ठेवायला देतात आणि मग विश्वासघात झाल्यानें पश्चात्ताप पावतात!

असे अनेक प्रकार घडत असलेले पाहिले म्हणजे खेड्यांतील लोकांसाठी बँकिंगची किती आवश्यकता आहे, तें चटकन् लक्षांत येते. वास्तविक पहातां शहरांतील लोकांजवळच खरा पैसा असतो. गिरण्या, कारखाने, व्यापार व इतर उद्योगधंदे करून शहरांतील लोक खूप पैसे मिळवितात. पण हा पैसा हे लोक लगेच बँकांतून ठेवीत असतात, ह्यामुळें त्यांना त्याच्या रक्षणाची कसली ती काळजी वाहावी लागत नाहीं. वाटेल तेव्हां पैसा ठेवणें व काढणें ह्या गोष्टी ह्या बँकिंगच्या सोईमुळें त्यांना करतां येत असल्यानें त्यांचा फार फायदा झालेला आहे.

खेड्यामध्यें जेथें पोस्ट ऑफिस असेल तेथें लोकांना हवें असेल तर सेव्हिंग बँकेची सोय सरकारनें केलेली आहे. पण ह्या सोईचा फायदा कसा घ्यावा याची कल्पनाच अजून सामान्य लोकांना आलेली दिसत नाहीं. लोकांचें हित व्हावें अशी इच्छा करणाऱ्या पुढाऱ्यांनीं आणि सरकारनें ह्या बाबतींत अधिक प्रचार करण्याची व लोकमत तयार करण्याची जरूर आहे. खेड्यांतील पुष्कळ लोक अजून निरक्षर आहेत. कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायट्या किंवा सहकारी पतपेढ्या कांहीं खेड्यांतूनही स्थापन झालेल्या आहेत पण त्या बहुधा कर्ज देण्याचाच व्यवहार करीत असतात; सामान्य लोकांच्या लहानमोठ्या ठेवी ठेवून घेणें आणि लागतील तेव्हां त्यांना देणें ह्या कामासाठीं ह्या सोसायट्यांचा किंवा पतपेढ्यांचा उपयोग होत नाहीं.

खेड्यांमध्यें बँका चालू करणें हें कठीण काम आहे, हें मला माहीत आहे; पण तें तितकेंच जरूरीचें आहे असें मला वाटतें. ह्या बँकांमुळें लोकांना पैसा राखून ठेवण्याची संवय लागेल आणि त्यांच्या कर्जबाजारीपणासही थोडा आळा असेल असें मला वाटतें.




पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)
पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मीरोड.
मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–
ब्रँच सेक्रेटरी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## हिंदी फळ–संरक्षण धंद्याच्या वाढीस जकातींचें सहाय

हिंदुस्थानांत अनुकूल भौगोलिक परिस्थितीमुळें फळांच्या उत्पादनाला पुष्कळ अवसर आहे व अगदी सामान्य दर्जापासून उच्च दर्जाचीं फळें निरनिराळ्या प्रकारच्या अनुकूल हवामानाच्या विविधतेमुळें आपल्या देशांत होतात. उ. कोंकणांतील करवंद किंवा काजू यापासून तों काश्मीरमधील थंड हवेंतील सफरचंदासारखीं फळें होऊं शकतात. १८६० पर्यंत बेताची लोकवस्ती, लोकांच्या थोड्या गरजा व बैठे उद्योगधंदे यामुळें व्यापारी दृष्टीनें फळांच्या लागवडीकडे विशेष रीतीनें लक्ष दिलें गेलें नाहीं परंतु ब्रिटिश आमदानींत वाढती लोकसंख्या, भांडवलशाहीला सुरवात, वाढत्या गरजा, शहरांतील जीवन, आहारामध्यें जीवनसत्त्वाच्या दृष्टीनें फळांचा उपयोग इ. गोष्टींमुळें फळांची लागवड, विक्री व फळांचे टिकाऊ पदार्थ बनविणें या गोष्टींकडे व्यापारी व औद्योगिक दृष्ट्या लोकांचें लक्ष जाऊं लागलें. कोंकणांतील कलमी आंब्यांची लागवड व व्यापार, दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यांतील काजू बियांचा व्यापार, नाशीककडील द्राक्षांची लागवड, वसई व केळवें–माहीम या भागांतील केळ्यांची लागवड इ. गोष्टी या परिस्थितीच्या निदर्शक आहेत. प्रथम फक्त फळांची लागवड व विक्री याकडे लक्ष दिलें जाई; परंतु १९२० नंतर व्यापारी दृष्टीनें फळांचा साखरपाक किंवा आटवलेला रस बनविणें, टिकाऊ पेयें बनविणें इ. गोष्टींकडे लोकांचें थोडेसें लक्ष जाऊं लागलें. मुंबईला मधु कॅनिंग कं. किंवा पुणें येथें रूरल प्रॉडक्टस् कं. सारख्या कांहीं कंपन्या फळांपासून रस, सरबतें, टिकाऊ पदार्थ किंवा अर्क इ. बनविण्यासाठी स्थापन झाल्या आहेत. परंतु एक महत्त्वाचा उद्योग म्हणून या धंद्याकडे विशेषसें लक्ष गेलें नव्हतें. गेल्या कांहीं वर्षांत अशा उद्देशानें नवीन लहान लहान कारखाने निघत आहेत. या कारखान्यांच्या वाढीला मुख्य अडचण म्हणजे पॅकिंगसाठी टिनचे डबे, बरण्या, बाटल्या इत्यादींचें दुर्भिक्ष्य, यंत्रसामुग्रीची अडचण व आस्ट्रेलिया अमेरिका इ. देशांतून येणारे मुरांबे, जेलीज, फळांचे अर्क इत्यादींची स्पर्धा ही होय. विशेषतः गेल्या दीड वर्षांत अशा तयार मालाची फार मोठी आयात वरील देशांतून आपल्याकडे होऊं लागली आहे, व ही परराष्ट्रीय स्पर्धा हिंदी फळसंरक्षणाचा धंदा वेळींच भक्कम पायावर उभा राहिला नाहीं तर त्याला मारक ठरण्याचा संभव आहे.

१९२३ पासून फिस्कल कमिशनच्या शिफारशीप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें औद्योगिक संरक्षण देण्याचें धोरण स्वीकारलें आहे. पोलाद, कापड, साखर या प्रमुख धंद्यांची वाढ संरक्षणानेंच झाली. हंगामी राष्ट्रीय सरकारनेंहि कित्येक धंद्यांची टॅरिफ बोर्डाकडून झटपट चौकशी करवून कांहीं धंद्यांना विशेषतः एक वर्षापुरतें संरक्षण नुकतेंच दिलें. फळांच्या धंद्याबद्दल टॅरिफ बोर्डानें नुकताच आपला अहवाल सादर केला, त्यास अनुसरून हिंदुस्थान सरकारनें २७ मेला पत्रक काढून या धंद्याला संरक्षण दिल्याचें जाहीर केलें आहे.

### टॅरिफ बोर्डाच्या शिफारसी

प्रथम टॅरिफ बोर्डाच्या शिफारशींचा थोडक्यांत विचार करूं. बोर्डाच्या असें निदर्शनास आलें कीं महायुद्धाच्या काळांतच फळसंरक्षण धंद्याची विशेष वाढ झाली असली तरी आज हा धंदा देशांत साधारणतः बद्धमूल झाला आहे, असें म्हणतां येईल. कच्चा माल, नैसर्गिक अनुकूल हवामान, मजूर वर्ग व गिऱ्हाईक या अनुकूल गोष्टी देशांत आहेत, व थोडा काळ संरक्षण दिलें असतां हा धंदा मजबूत पायावर स्थिरस्थावर होईल. या धंद्याच्या वाढीबरोबर बागाईत शेतीला साहजिक उत्तेजन मिळणार आहे. मुरांबे व लोणचीं यांचें हिंदुस्थानांतील उत्पादन वजनी २२ कोटि पौंडांचें व साडे तेरा कोटी रुपये किंमतीचें असावें, व त्याला परदेशांची स्पर्धेची फारशी भीति नाहीं. परंतु डब्यांतील टिकाऊ फळें, जेलीज, पेयें, स्कॉशेस् इ. बाबतींत परदेशांतील मालाच्या तीव्र स्पर्धेला तोंड द्यावें लागतें. टॅरिफ बोर्डाची शिफारस अशी आहे कीं डब्यांतील फळांचे बाबतींत शेंकडा ६०, जॅमस् इ. बाबतींत शेंकडा ८०, व स्कॉशेसच्या बाबतींत शेंकडा ४० याप्रमाणें संरक्षक जकाती ठेवाव्या व त्या ३१ मार्च १९५० पर्यंत चालू राहाव्या. संरक्षक जकात जरूरीपेक्षां १०% जास्त सुचविण्यांत आली आहे याचें कारण देशी कारखानदारांना आपल्या मालांत योग्य ती सुधारणा करतां यावी व हिंदी गिऱ्हाइकांस आकर्षतां यावें. परकी मालापेक्षां थोड्या स्वस्त दरानें माल विकता यावा हा १० टक्क्यांचा फायदा तात्कालिक स्वरूपाचा आहे हें हिंदी कारखानदारांनीं विसरता कामा नये. परदेशांतून यंत्रसामुग्रीची आयात कोठूनहि करण्यास कारखानदारांस परवानगी असावी, व १९४६ फेब्रुवारीनंतर आयात केलेल्या मशिनरीवरील जकात कारखानदारांस परत करावी. हा धंदा जाणणारे परकी तज्ज्ञ सरकारनें आपल्या खर्चानें तीन वर्षेपर्यंत येथें ठेवावे, व त्यांनीं येथील कारखानदारांस मोफत सल्ला द्यावा. अमेरिकेंतून टिनच्या पत्र्यांची बिनजकातीनें आयात करावी. कांच व डबे यांच्या कारखानदारांनीं फळसंरक्षक कारखानदारांशीं चर्चा करून धंद्याच्या दृष्टीनें योग्य असे डबे व बाटल्या तयार कराव्या.

बोर्डाच्या या शिफारशींचा सर्वस्वी स्वीकार सरकारनें केला नाहीं. सरकारनें एका वर्षापुरतेंच टारिफ बोर्डाच्या शिफारसीप्रमाणें संरक्षण जाहीर केलें आहे. धंद्यासाठी योग्य प्रमाणांत साखरेचा पुरवठा सरकारनें करावा ही टारिफ बोर्डाची सूचना सरकारनें मान्य केली आहे. हिंदी तयार मालाच्या निर्यातीस मुभा ठेवण्याचें सरकारनें ठरविलें आहे, यामुळें शक्य तेव्हां परदेशांत माल पाठविणें सोपें जाईल. आयात होणाऱ्या सर्वच प्रकारच्या मशिनरीवरील आयात जकात परत करण्याचा सरकार विचार करीत आहे. हा विचार ठरल्यावर तोच फळांच्या मशिनरीला लागू केला जाईल.

एक वर्ष संपल्यानंतर ह्या धंद्याची आणखी चौकशी पुन: टारिफ बोर्ड करील आणि आयात मालाच्या किंमतीवर विशिष्ट प्रमाणांत जकाती चालू ठेवावयाच्या का धंद्याला प्रत्यक्ष पैशानें मदत करावयाची, ह्याविषयीं टारिफ बोर्डाची शिफारस विचारांत घेऊन सरकार निर्णय करील.

---

**D. E. SOCIETY'S**

**Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4**

Applications for fresh admission to the First Year and B. Com. classes will be received up to the 12th June, 1947. The College prospectus containing the application form will be sent on receipt of postage stamps worth three annas. Applications received after 12th June will not be considered.

D. G. KARVE,
Principal.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे. ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... .. | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का कर-माफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर


**PUBLIC WORKS DEPARTMENT**

## NOTICE TO CONTRACTORS

SEPARATE sealed tenders in B-2 (item rate) Form are invited for constructing the following two buildings each estimated to cost Rupees 1,47,051 approximately and will be received by the Executive Engineer, Building Projects Division (No. 1), Poona 1 in his office at Poona, on the following dates:–

| Name of work | Last date for issuing tenders | Last date & time for receiving tenders |
|---|---|---|
| 1. Industrial School, Hubli. | Thursday, 26th June 1947 | Saturday, 28th June 1947 3 p. m. |
| 2. Industrial School, Bijapur. | Thursday, 26th June 1947 | Monday, 30th June 1947 3 p. m. |

and will be opened on the dates mentioned above. Rs. 1,471 for each work, as earnest money should be paid into the Reserve Bank of India or nearest Government Treasury and the receipt challan attached to the tender which should also be accompanied by a solvency certificate or Banker's certificate of financial stability without which the tender shall not be considered.

2. Blank tender forms can be obtained on payment of Rs. 10/- per copy for each work from the above named office during office hours on all working days upto the dates mentioned above, where the plans and contract documents can also be seen,

3. The Contractor shall quote the rates in words and figures and work out the amounts for each item and the total given at the end. No alteration in the form of the tender or in the schedule of quantities and no addition in the shape of special stipulation shall be permitted.

4. Tenders which do not fulfil any of the above conditions or those in the printed tender and are incomplete in any respect, will be rejected.

5. Acceptance of the tender rests with the Chief Engineer, Public Works Department, Poona who reserves the right of rejecting any or all tenders without assigning any reasons.

Central Buildings
Poona 1,
2nd June 1947.

Sd/- L. W. Kale,
Executive Engineer,
Building Projects Division
(No. 1)

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून.)

सामाहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ३।६।४७ | बुधवार ४।६।४७ | गुरुवार ५।६।४७ | शुक्रवार ६।६।४७ | सोमवार ९।६।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २११७-८; २६६-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २०३० | १९०७-८ | २००० | २०२० | २०५० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ३९६ | ३७५ | ३९१ | ३९४ | ३९९-८ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २६-४ | २५-४ | २६-६ | २७-४ | २८-१० |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३३-४ | ३२-२ | ३३-१० | ३४-३ | ३५-६ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| २२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १०४५ | १०१० | १०६५ | १०६० | १०९५ |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६५५ | ६३३ | ६३९ | ६३७ | ६४७ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६२५ | ६०८ | ६२४ | ६२२ | ६३६ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २८४ | २८१ | ३०२ | ३०२ | ३१३ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३०२ | २९४ | ३०० | २९९ | ३०९ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०० | २९४ | २९८ | २९८ | ३१३ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३४२ | ३३३ | ३५० | ३४२ | ३४७ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ३-१३ | ३-१२-६ | ४-० | ४-१ | ४-१ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १५-७ | १५-२ | १५-१४ | १५-११ | १६-१० |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | १-१२-६ | २-१२ | २-१४-६ | २-१४ | ३-० |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ५४२-८ | ५२७-८ | ५४५ | ५४७-८ | ५६१-४ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | ११० | १७३-८ | १६९-८ | १७३ | १७२-८ | १७५ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २६९ | २६० | २६५ | २६६ | २७१ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४४० | ४३५ | ४३५ | ४४२-८ | ४८७-८ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १० | ३१-१२ | ३०-६ | ३१-१२ | ३१-८ | ३२-७ |


## कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

डिस्टिलरी लवकरच सुरू होणार

**ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.

—संचालक मंडळ—

रावबहादूर व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी. व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. बी. पोतदार, बी.ए., एलएल.बी., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, ( एक्स-ऑफिशिओ ) पुणें. अधिक माहितीसाठी लिहा—

कृष्णा-किन्नूर, जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्.

कंपनीच्या पहिल्याच वर्षीच्या ऊंसगाळणीस सुरुवात होऊन अथावत् पद्धतीचा एकजिनसी गूळ तयार होऊं लागला.

## पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट-कुरोली, ( जि. सोलापूर )

अधिकृत भांडवल : रु. १०,००००० ( दहा लाख )
विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ५,००००० ( पांच लाख )
पुढीलप्रमाणें—१०००—५ टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकी रु. १०० चा. ६००० "बी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. ५० चा. १०००० "सी" क्लास ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी रु. १० चा ( "सी" क्लासचे सर्व शेअर्स खपले आहेत. )

—शेअर्सची विक्री चालू आहे—

त्याच्या रकमा पुढीलप्रमाणें भरावयाच्या आहेत.

अर्जासोबत शेअरसंख्या ¼ व अर्जमंजुरीनंतर ¼ व उरलेली रक्कम प्रत्येक कॉलमध्यें तीन महिन्यांपेक्षा कमी अंतर नसलेल्या दोन हप्त्यांनी.

★ कंपनीस मिरज ( ज्यु. ) दरबारनें १५ वर्षे इन्कमटॅक्स माफ केला आहे व इतर सवलती देऊन रु. २५,००० चे शेअर्स घेतले आहेत.

★ पहिल्याच वर्षी कंपनी १० टक्के डिव्हिडंड देण्याची हमी घेत आहे. शेअर-फॉर्म, माहितीपत्रकें याकरितां वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्टस् : जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी.

इन्फर्मेशन ऑफिसेस :
पुणें-लक्ष्मी रोड, गणपति चौक, बुधवार, नं. ६२, पुणें २.
पंढरपूर—नवी पेठ, पंढरपूर.

### श्री. न. गं. आपटे ह्यांची फेरनिवडणूक

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इन्डस्ट्रीला इंडियन कौन्सिल ऑफ अॅग्रि. रिसर्चच्या गव्हर्निंग बॉडीवर एक प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार आहे. ह्या प्रतिनिधींची त्रैवार्षिक निवडणूक नुकतीच झाली. फेडरेशनच्या ६७ सभासद-संस्थांनीं मतें नोंदलीं. निवडणुकीचा निकाल खालीं दिला आहे:—

| | मतें |
|---|---|
| श्री. न. गं. आपटे, पुणें | ३४ |
| श्री. अशुतोष भट्टाचार्य, कलकत्ता | १६ |
| श्री. बी. पी. डालमिया, कलकत्ता | ८ |
| मि. दिनशा, कराची | ६ |
| श्री. सिंह, दिल्ली | १ |
| सरदार सिंह, लखनौ | १ |
| श्री. पी. डी. सिंघानिया, कानपूर | १ |
| एकूण | ६७ |

श्री. न. गं. आपटे हे १९४१ सालीं प्रथम निवडून आले, तेव्हांपासून ते सतत गव्हर्निंग बॉडीवर आहेत आणि त्यांस निवडणुकींत अधिकाधिक मतें पडत आहेत ह्यावरून त्यांचें काम फेडरेशनला पसंत पडलें आहे, असें दिसतें.

---

**दि बॉंबे मर्कंटाइल बँक लि., माधवनगर (मिरज ज्यु.)**

वरील बँकेचें वसूल भांडवल ७ लक्ष रु. असून तिचेकडे ठेवी २६ लक्ष रुपयांच्या आहेत. बँकेनें २० लक्ष रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. १९४५ अखेर साठलेला तोटा १९४६ सालाच्या १,११२ रु. नफ्यानें कमी होऊन तो आतां ५८ हजार रु. जिंदगी खात्यास राहिला आहे. बँकेनें अहवालाचे वर्षी ६९ हजार रु. व्याज मिळवलें व ३५ हजार रु. व्याज दिलें. कमिशन, ब्रोकरेज वगैरेचे २८ हजार रु. मिळाले. व्यवस्थाखर्च ४३ हजार रु. आला. सर चिनुभाई माधवलाल, बॅरोनेट, हे बॅंकेचे चेअरमन आहेत. बँक मिरज ज्यु. मध्यें नोंदलेली आहे. बँकेच्या डायरेक्टरांनीं गेल्या २½ वर्षांत फी अगर भाडेखर्च घेतलेला नाहीं. सांगली येथें ऑक्टोबर १९४६ मध्यें शाखा उघडण्यांत आली. "बँकेची एकसारखी प्रगति होत आहे आणि तिचे खातेदार वाढत आहेत. तेव्हां लवकरच प्रारंभींचा तोटा भरून येईल" अशी आशा डायरेक्टर बोर्डानें रिपोर्टांत व्यक्त केली आहे.

---

**दि सह्याद्रि फॉरेस्ट प्रॉडक्ट्स लि., कराड**—कोयना खोऱ्यांत असलेल्या मुबलक जंगल संपत्तीचा उपयोग करून घेण्यासाठी ही कंपनी स्थापन झाली आहे. "सह्याद्रि इंडस्ट्रीज"-कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

---

**हिंदुस्थानांत स्वित्झरलंडची वकिलात**— हिंदुस्थानचे स्वातंत्र्य जून १९४८ पूर्वींच मान्य करण्याचें ब्रिटननें आश्वासन दिल्यामुळें स्वित्झरलंडच्या सरकारनें हिंदुस्थानांत वकिलात उघडण्याचें ठरविलें आहे. या वकिलातीसाठी स्विस फेडरल कौन्सिलनें पार्लमेंटकडे मंजुरीची मागणीही नुकतीच केली.

**हैद्राबाद संस्थानांतील कोळशाच्या खाणी**—हैद्राबाद संस्थानांतील कोळशाच्या खाणी अद्यावत यंत्रसामुग्रीनें सुसज्ज करण्यांत येणार असल्याची बातमी आहे. त्यासाठी ५ लाख पौंड खर्च येणार असून त्यामुळें कोळशाचें उत्पादन १० लाख टनांपासून २५ लाख टनांपर्यंत वाढेल असा अंदाज करण्यांत आला आहे.


# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : ७ सप्टेंबर, १९०६ ]

खपलेलें भांडवल : ३,००,००,००० रु.
वसूल झालेलें भांडवल : १,५०,००,००० रु.
रिझर्व्ह फंड : २,००,००,००० रु.

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

—शाखा—

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद | काळबादेवी | कराची |
| भद्र (मुख्य ऑफिस) | मलबार हिल | मद्रास |
| एलिस ब्रिज | कलकत्ता | नागपूर |
| माणेक चौक | क्लाईव्ह स्ट्रीट | किंग्जवे |
| स्टेशन ब्रँच | (मुख्य ऑफिस) | इतवारी बझार |
| अमृतसर | बडा बझार | पुणें |
| अंधेरी (मुंबई शेजारीं) | चौरंगी स्केअर | पुणें शहर |
| वांद्रें (मुंबई शेजारीं) | कालिकत | पालनपूर |
| भुज (कच्छ) | कोइमतूर | राजकोट |
| मुंबई | हैद्राबाद (सिंध) | सोलापूर |
| बुलियन एक्स्चेंज | जमशेदपूर | सुरत |
| कुलाबा | जुनागड | वेरावळ |


लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.
तपशीलासाठी चौकशी करा.

बी. एन. अटल, एजंट, पुणें
ए. सी. क्लार्क, जनरल मॅनेजर





## अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२५ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.